# ऋ ण नि र्दे श

प्रस्तुत शोधप्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रस्तुत शोधप्रबंधासाठी माननीय डॉ. रामचंद्र भालचंद्र देवस्थळी, एम्.ए.,एम्.एड्.,पीएच्.डी., प्रपाठक, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी वेळोवेळी यथाचित मार्गदर्शन करुन, प्रोत्साहन देऊन, इतर कामाचा व्याप असतांनाही वेळात वेळ काढून निरपेक्ष, कर्तव्यबुध्दीने मार्गदर्शन केलेले आहे. त्यामुळेच मी हा शोध-प्रबंध पूर्ण केला. प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संदर्भात त्यांचा लाभलेला सहवास अधिक मोलाचा ठरला म्हणून त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा ऋणभार सहन करणे योग्य आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या संदर्भात प्रपाठक माननीय सौ.डॉ. सीमा म. येवले, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, प्रपाठक माननीय डॉ. (श्रीमती) पद्मिनी मनयत सुकुमारन, बी.एस्.सी.एड्., एम्.एड्., पीएच्.डी., शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनीही मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांचे मी सदैव ऋणी आहे.

माझ्या व्यक्तित्वाला आशय आणि आकार देणारे माननीय माजी मुख्यकार्यकारी अधिकारी बलदेव सिंह साहेब, जिल्हा परिषद, कोल्हापूर, माननीय माजी शिक्षणाधिकारी श्री. सर्जेराव जाधवसाहेब, जिल्हा परिषद, कोल्हापूर, माननीय माजी गटशिक्षणाधिकारी श्री. विश्वास हंकारे, पंचायत समिती, करवीर यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे. तसेच माननीय श्री. आनंदराव काशिंडे शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, माननीय मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. श्रीधर पळसुले, जिल्हा परिषद, कोल्हापून, माननीय

गटशिक्षणाधिकारीसो श्री. शामराव भोई, पंचायत समिती, करवीर, माननीय एस्.डी. पाटील, विस्तार अधिकारी, माननीय ब बी.के. मोरेसो, माननीय, आर.आर. पाटीलसो, माननीय शिरढोणेसो, माननीय सोहनीसो, गांधीनगर केंद्रातील सर्व अध्यापक व सर्व मुख्याध्यापक माननीय पारिसवाडकरसो यांचे मला वारंवार सहकार्य मिळाले. त्यांचे मी आभार मानते.

माझे पती सिकंदर बिजली, मुलगा, अल्ताफ बिजली, मुलगी शामा बिजली व असमा बिजली यांच्या प्रेरणा, प्रोत्साहनातून स्फूर्तीतून हे संशोधन पूर्ण केले.

सदरच्या संशोधनासाठी मुलाखतसूची भरुन देणारे विद्यार्थी, अध्यापक, मुख्याध्यापक यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद ।

सुबक टंकलेखन करुन देणारे मित्रवर्य श्री. विष्णूपंत खाडे यांचे आभार.

या शोधप्रबंधाने करवीर तालुक्यातील प्राथमिक शाळामधील मराठी विषयाच्या अध्यापनाचा आजच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास करणे या बाबत निश्चितपणे चांगला उपयोग होईल अशी अभिलाषा करते.

स्थळ : कोल्हापूर.
दिनांक : १ जून, १९९७.

(अन्वरबी अब्बास हवलदार)
Havaldar AA